# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**वित्त व लेखा विभाग**

**आय.एस.ओ.९००१-२००८ युनिट**

## परिपत्रक

महाराष्ट्र शासनाने १ एप्रिल, २०१२ पासून महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठांना कॉमन अकौन्टस कोड लागू केलेला आहे. कॉमन अकौन्टस कोड अन्वये विद्यापीठाला प्राप्त होणारे शुल्क/अनुदान जमा होणारे बँक खाती वित्त व लेखा अधिकारी यांच्या नावाने असण्याबाबत सर्व साधारण तत्वे कलम १.५५ (१ ते ४) व कलम १.५६ (२) मध्ये नमूद केलेले आहे. यास अनुसरून कॉमन अकौन्टस कोड २०१२ अन्वये मा. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या नावे असलेली रकमा जमा करण्यासंदर्भातील सर्व बँक खाती व्यवस्थापन परिषद ठराव क्र. म:३४९/१३०९१४ अन्वये मा. वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे नावे करण्यात आलेली आहेत.

तरी यापुढे विद्यापीठाला जमा होणाऱ्या सर्व रकमा वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे या नावाने पाठविणे आवश्यक आहे.

विविध विभागांमार्फत मुख्य वित्त व लेखा विभागात विद्यापीठाच्या विविध शुल्कांचे धनाकर्ष वटविण्यासाठी पाठविले जातात. यापुढे सदर धनाकर्ष वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे या नावाने घेण्यात यावेत.

वर नमूद केलेल्या बाबींची नोंद घेऊन त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी, ही विनंती.

10/12

**वित्त व लेखा अधिकारी**

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
**जा.क्र.:** वित्त/२०१४-१५/२०३४
**दिनांक :** १०/१२/२०१४

**प्रत माहिती व योग्य कार्यवाहीसाठी :**

१) मा. विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२) मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, पुणे
३) मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालय/संस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे